| MHKO070013922016 | **रे.क.नं.२५०/२०१६** |
| --- | --- |
| | रमेश नामदेव कांबळे आणि इतर<br>विरुध्द<br>अमोल यशवंत कांबळे आणि इतर |

नि.क्र.५१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे प्रतिवादी क्र.३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकुम सेट असाईड होणेबाबत दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.३ लहू बापू कांबळे हे दि.०६/०५/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणलेने त्यांचे विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रतिवादी क्र.३ हे कोल्हापूर येथे राहणेस असल्याने त्यांना दावे कामी समन्स ही लागू करता आलेले नव्हते. दावेची समन्स जाहीर नोटीस देवुन लागू केलेले आहे. प्रतिवादी क्र.३ हे मयत झालेबाबत समजुन आले नाही. प्रतिवादी यांनी मयत झालेबाबत मे. कोर्टासमोर सांगितलेनंतर त्याबाबत त्याच्या वारसांची व त्यांचे मृत्यू दाखलेची माहिती घेवुन कामी वारस रेकॉर्डसाठी अर्ज दिलेला आहे. मुदतीत वारस रेकॉर्डवर न आणणे मागे वादीचा कोणताही गैरहेतू नव्हता व नाही. प्रतिवादी क्र.३ च्या मृत्यूच्या माहिती अभावी मुदतीत वारस रेकॉर्डवर आणता आलेले नाही. सबब वरील कारणांचा विचार करुन प्रतिवादी क्र.३ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन सोबत दिले वारस रेकॉर्डवर घेणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने प्रतिवादी क्र.१ तर्फे त्यांचे म्हणणे देवुन कथन करण्यात आलेले आहे की, अर्जामधील सर्व कथने खोटी व चुकीची आहेत. वादी यांना प्रतिवादी यांचे मृत्यूबाबत माहिती नसलेचे विधान चुकीचे आहे. वादी व प्रतिवादी हे नात्यामधील असलेने मृत्यू बाबतची माहिती वादीना होती. मात्र जाणीवपुर्वक वादीनी वारस रेकॉर्डवरती

घेतले नाहीत. तसेच विलंब माफीच्या अर्जातील कथने देखील चुकीची आहेत. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे. तथापि मे. कोर्ट सदरचा अर्ज मंजुर करण्याच्या निर्णयापावेतो आलेस वादींना रु.३०००/– कॉस्ट करणेत यावी अशी विनंती केली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादी क्र.३ चे वारस म्हणून त्यांचे विरुध्द दावा चालविणेचा अधिकार असलेने दावेत त्यांना रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. नि.क्र.४९ वर प्रतिवादी क्र.३ चे मृत्यू प्रमाणपत्र हे दाखल करण्यात आलेले आहे. वादीतर्फे नि.क्र.५० ला प्रतिवादी क्र.३ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवुन मिळणेकामी अर्ज केलेला आहे. अर्जातील कथन व कारण पाहता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. तसेच अर्ज दाखल करण्यासाठी घेतलेला वेळ पाहता त्यावर कॉस्ट लावल्यास उद्देश सफल होईल. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

– **आदेश** –

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.५१) हा वादी यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.२५०/–(रु.दोनशे पन्नास फक्त) आव्हानित प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ यांचे विरुध्द झालेला तांत्रीकदृष्टया अबेटमेंटचा आदेश खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.01.08 17:40:15 +0530

दि.०८/०१/२०२६ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 08/01/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 08/01/2026. |
| Judgment/order uploaded on | 08/01/2026. |